ISSN 2394-5303

# Printing Area®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Revised Edition

Editor
Dr.Bapu G.Gholap

http://www.vidyawarta.blogspot.com
https://sites.google.com/site/vidyawartajournal

29) भारताच्या ग्रामीण विकासात कृषी धोरणाची भुमिका.
कांतीलाल शंकर पाटील, जव्हार, जि. पालघर || 137

30) पद्मिनी वसंत शिंगे यांचे आम्रपाली महिला मंडळ व त्याचे आंबेडकरी चळवळीतील कार्य
डॉ. संघमित्रा विठ्ठलराव सरवदे-पाचपिंडे, जि. कोल्हापूर || 140

31) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील प्राथमिक शिक्षण एक आढावा
श्री. दिलीप बाबुराव काळे, डॉ. आनंद माधवराव वाघ,औरंगाबाद. || 146

32) विद्यार्थ्यांची शैक्षणिक उपलब्धी व अभ्यास सवयींचा संबंध
नंदकिशोर आनंदराव खिल्लारे , औरंगाबाद. || 149

33) आदिवासी जाणिवेची कादंबरी
डॉ. हिराजी बनपूरकर, चामोर्शी जि. गडचिरोली || 151

34) नवोदय विद्यालय, केन्द्रीय विद्यालय एवं माध्यमिक विद्यालय के विद्यार्थियों.....
शिशुपाल सिंह, कानपुर नगर || 156

35) भारत में समुद्री पुरातत्व—एक अनुशीलन
डॉ० जमील अहमद, इलाहाबाद || 164

36) केदारनाथ अग्रवाल की काव्य—चेतना
डॉ. मोदम्मद अजहर ढेरीवाला, प्रतापगंज, वड़ोदरा || 169

37) विशिष्ट महत्व है, प्राचीन भारतीय अभिलेख का
डा० ज़ेबा इस्लाम, इलाहाबाद || 174

38) औषधियों द्वारा हड्डी का उपचार : एक मानवशास्त्रीय अध्ययन उरांव जनजाति के सन्दर्भ में
सोनी वर्मा, लखनऊ। || 179

39) भारत में कन्या भ्रूण हत्या के कारण व समाधान
श्रीमती संगीता रचियता, श्रीगंगानगर (राज.) || 181

40) महिला सशक्तीकरण से सम्बन्धित योजनाएँ (जनपद अल्मोड़ा के विषेश सन्दर्भ में )
दीपक कुमार टम्टा, अलका आर्या, अल्मोड़ा || 185

41) साहित्य अनुसंधान और मानव समाज
डॉ.शेवाळे हनुमंत दत्तु,परभणी || 188

42) जन सरोकारों का कवि धूमिल
डॉ. उमेश चन्द्र शुक्ल, परेल,मुंबई || 191

43) सरगुजा के पारंपरिक जनजातीय पर्व एवं त्यौहार का अनुशीलन
डॉ. सचिन मंदिलवार, अम्बिकापुर (छत्तीसगढ़) || 196

५) ग्रामीण भागात शेतमाल विक्रीमध्ये दलाल व मध्यस्थांचे प्रस्थ मोठे असून शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची योग्य किंमत मिळत नाही.

**शिफारशी :—**

१) अल्पभुधारक व सिमांत शेतकऱ्यांचे देशातील एकूण प्रमाण लक्षात घेता

कृषीधोरणात या प्रमूख घटकांवर लक्ष केंद्रीत करण्यावर भर दिला जावा.

२) ग्रामीण भागातील शेतमाल विक्रीमधील दलाल व मध्यस्थांचे संपूर्ण उच्चाटन होणे गरजेचे आहे.

३) कृषी उत्पन्न बाजार समित्यांची संख्या वाढवावी.

४) शेतकऱ्यांच्या जास्तीत जास्त शेतमालास आधारभूत किंमत मिळावी.

५) शेतकऱ्यांना पर्याप्त प्रमाणात कर्ज पुरवठा उपलब्ध करुन देणे.

**संदर्भ :—**

१) भारतीय अर्थव्यवस्था — प्रा. प्र. रा. कुलकर्णी
२) भारतीय अर्थव्यवस्था — कै. डॉ. स. श्री. मु. देसाई डॉ. सौ. निर्मल भालेराव
३) कृषी अर्थशास्त्र — डॉ. विजय कविमंडन
४) भारतीय अर्थव्यवस्था —एस. एच. अट्टावलकर
५) भारतीय अर्थव्यवस्था —डॉ. एस. व्ही. ढमठेरे
६) Indian Economy —Datt & Sundharam

❖❖❖

**30**

# पद्मिनी वसंत शिंगे यांचे आम्रपाली महिला मंडळ व त्याचे आंबेडकरी चळवळीतील कार्य

**डॉ. संघमित्रा विठ्ठलराव सरवदे-पाचपिंडे**
सहाय्यक प्राध्यापक,
मा.श्री. आण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले जि. कोल्हापूर

**********

**सारांश :**

भारतीय समाज व्यवस्थेने स्त्रियांना दुय्यम स्थान दिलेहोते. स्त्रियांचे जीवन चूल आणि मूलतसेच वृत्त-वैकल्ये यामध्ये बंदिस्त झाले होते. भारतीय स्त्रिया जाती-जातीत विभागल्यामुळे त्याच्यात भगिनी भाव आढळून येत नाही. पण डॉ आंबेडकरांच्या विचाराचा धागा पकडून अडल्या-नडल्यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून मानवतावादी दृष्टिकोणातून पद्मिनीशिंगे यानी विविध जाती-धर्माच्या स्त्रियांना एकत्र करुन आम्रपाली महिला मंडळाची स्थापना केली. त्यांच्या मूलभूत प्रश्नांचीसनदशीर मार्गाने सोडवणूक केली व मदतीचाहात दिला. त्या जेव्हा एकत्रयेत तेव्हा त्यांना आंबेडकरी विचाराचे महत्त्व समजावून देत असत. त्यामुळे या स्त्रियांमधील जाती विषयीची संकुचित दृष्टी जाऊन त्या दबल्या-पिचल्या जातीसमुहाच्या अन्याय अत्याचारा विरुद्ध पद्मिनीशिंगे यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. त्या बळावर शिंगे या स्थानिक ग्रामपंचायतीमध्ये तीन वेळा सरपंच म्हणून व एक वेळा पंचायत समितीसदस्य म्हणून निवडून आल्या. गावाचा विकास असेल किंवा दलितांवरील अन्याय अत्याचार असेल, नामांतराचा लढा या सर्व प्रकारच्या लढ्या मध्ये या स्त्रिया जातीची पारंपारिक चौकट मोडून भगिनी-भाव निर्माण करुनएकत्रित येतात व अन्याया विरुद्ध उभ्या राहताना दिसतात, ही गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक अंतराभिसरण (Social Endosmosis) या संकल्पनेचे प्रतिरुप मानता येईल.

**महत्त्वाचे शब्द (Key Words) :**

आंबेडकरी विचार, आंबेडकरी चळवळ, आंबेडकरी चळवळीतील स्त्रिया, नामांतर चळवळ, सामाजिक अंतराभिसरण

(Social Endosmosis).

**प्रस्तावना :**

भारतीय समाज व्यवस्थेने स्त्रियांना दुय्यम स्थान दिले होते. स्त्रियांचे जीवन चूल आणिमूलतसेचवृत्तवैकल्ययामध्येबंदिस्तझ ालेहोते. धर्म, समाज व पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांचे शोषण केले जात होते. वर्ण व्यवस्थेवर आधारित या समाजात दलित स्त्री ही दुहेरी शोषणामध्ये अडकली होती. डॉ. आंबेडकरांनी केवळ दलित स्त्रियांची मुक्ती केली नाहीतर सर्वच भारतीय स्त्रियांच्या समुदायाला त्यांनी मुक्त केले. डॉ. आंबेडकरांनी स्त्री व शूद्र यांच्या स्थानाची चिकित्सा केली व त्यांच्या विकासाची दिशा निश्चित केली. स्त्रियांच्या हक्क आणि अधिकारांचा विचार केला. समाजातील विविध स्तरावरील स्त्रियांना भोगाव्या लागणा-या व्यथांची कारणमिमांसा केली व स्त्रियांच्या अवनतीस मनुहाच जबाबदार आहे, असे मत मांडले. स्त्रियांनी समाजिक क्रांतीत प्रत्यक्ष सहभाग घेतला नाहीतरती क्रांती अपूर्ण व एकांगी राहील याची त्यांना जाणीव होती. म्हणूनत्यांनी त्यांच्या मानव मुक्तीच्या लढ्यात स्त्रियांना सहभागी करून घेतले. डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानात पुरुष आणि स्त्री यांना समान अधिकार आहेत. भारतीय संविधान व हिंदू कोड बिलाद्धारे त्यांनी भारतीय स्त्रियांच्या स्वातंत्र्याची, अस्मितेची मंगलमय पहाट जागवली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे व दयाळू प्रज्ञेमुळे आजचीस्त्री सन्मानाने, प्रतिष्ठेने तिचे स्वत्व जगत आहे. त्याचे पद्मिनी वसंत शिंगे व त्यांचे आम्रपाली महिला मंडळ हे उत्तम उदाहरण आहे.

**उद्देश्य :**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित झालेल्या पद्मिनी वसंत शिंदे व त्यांच्या आम्रपाली महिला मंडळाच्या इतिहासाचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती :**

या संशोधन पेपरसाठी प्रामुख्याने मुलाखत तंत्राचा उपयोग केला आहे. त्याच बरोबर त्यांच्या दप्तरातील मुळ दस्तऐवजाचा उपयोग केला आहे.

**पद्मिनीशिंगेयांचे चरित्र :**

पद्मिनी वसंत शिंगे, वय : ५५ वर्षे, रा. पट्टणकोडोली, ह. मु. राजेंद्रनगर झोपडपट्टी, कोल्हापूर.

त्या सध्या कोल्हापूर महानगरपालिकेत झाडू कामगार म्हणून कार्यरत आहेत. त्या अशिक्षित असून केवळ सही करण्यापुरते त्यांचे शिक्षण झालेले आहे. पद्मिनीशिंगे यांना ३ मुलीहोत्या पैकी सध्या २ हयात आहेत. त्या अशिक्षित असल्याने त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लिखाण त्यांच्या मुलींकडून वाचून घेतले आहे. एवढेच नाहीतरत्यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे साहित्य व त्यांच्या बाबतीतील विचारधारा आपल्या मुलींकडून वाचून घेतली आहे. तसेच, त्या त्यांच्या तरुणपणा पासून आंबेडकरी चळवळीत कार्यरत असल्यामुळे देखील त्यांना आंबेडकरी विचारधारेची माहिती आहे. तसेच, त्या सलग तीन वेळा सरपंच म्हणून निवडून आल्या. त्या वेळी त्यांनी जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६० च्या तरतुदींचा व शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास त्यांच्या मुलींकडून करून घेतला आहे. त्यांचे दप्तर चाळत असताना त्यामध्ये शासनाच्या विविध योजनांच्या माहिती पुस्तिकांच्या छायांकित प्रती आढळून आल्या.

त्यांचे वडील सरकार उदयसिंग गायकवाड यांच्याकडे शिपाई म्हणून कामाला होते. कोल्हापूर जिल्ह्यातील व हातकणंगले तालुक्यातील मजलेहे त्यांचे माहेर ! जमिनीचा फाळा जमा करून तो सरकारात जमा करण्याची कामेते काम करत. या कामासाठी त्यांना १६ एकर जमीन मिळालीहोती. पण पाऊस कमी असल्यानेती पीकत नसे. पद्मिनीशिंगे यांना १२ भावंडे होती. त्यामुळे घरची परिस्थिती बेताचीच होती. वडील ग्रामपंचायतीशी संबंधित असल्यामुळे त्यांची राजकारणाशी ओळख्र झाली.

भारतातील जाती व्यवस्थेचे वैशिष्ट्य असे आहे की, प्रत्येक समाज घटकातील जाती आपला आदर्श निवडताना ते आपल्याच जातीतील आदर्श समजलेली प्रतिके आपल्या समोर ठेवतात. इतर जातीतील व विशेषतः त्यांच्या जातीपेक्षा निम्न समजल्या जाणाज्या जातीमधील आदर्श प्रतिके भलेही त्यांच्या जातीतील प्रतीकापेक्षा अधिक योग्य व हितकारक असतील तरी ते तो घेण्याचे टाळतो. ही वास्तववादी सामाजिक मानसिकता आहे.

जाती-पंथ-धर्म निरपेक्ष व क्षितिजा पलीकडे पाहण्याची दृष्टी अपवादात्मक व्यक्तींमध्ये (महापुरुषांमध्ये) आढळते. पद्मिनीशिंगे या मातंग समाजातील असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांकडे कशा वळल्या याबाबत त्या म्हणाल्या, गावात (त्यांच्या माहेरी) आमचं (मातंग समाजाचं) एकच घरहोतं. आई-वडिलांच्या घरी मला शिक्षण मिळालं नाही. पण बाबांनी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर) मला नवी दृष्टी दिली. त्यांच्या विचारांतून मला खूप शिक्षण मिळालं आहे.

या बाबत बोलताना त्या म्हणाल्या की, त्या लहान असताना त्यांच्या गावात स्पृश्यास्पृश्यता पाळली जायची. त्या मातंग जातीत जन्मास आल्यामुळे याचा त्यांना फटका बसू लागला. त्या मुळातच बंडखोर असल्यामुळे त्यांना वरतून (हाताचा किंवा भांड्याचा स्पर्श न होऊ देता) पाणी वाढणे, बाट पाळणे या अनिष्ट रुढी, परंपरांनात्यांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला. जवळच असलेल्या बौद्ध वस्तीमध्ये त्या जाऊ लागल्या. येथून त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे बाळकडू मिळू लागले. त्यांनी ठरवले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार पुढे घेऊन आपण

या रुढी, परंपरांविरुद्ध लढायचे. त्या उपवर झाल्यानंतर त्यांना असे वाटू लागले की, आपला विवाह जर आपल्या मातंग समाजातील तरुणासोबत झाला तर आपणास तोसमाजासाठी काम करु देईल याची शास्वती नाही. हे जाणूनत्यांनी महारसमाजातील तरुणासोबत विवाह करण्याचे निश्चित केले व त्यानुसार पट्टणकोडोलीतील वसंत शिंगे या सैन्यात शिपाई म्हणून काम करत असलेल्या महार समाजातील तरुणाशी विवाह केला. विवाहाच्या वेळी त्यांनी त्यांस हे निक्षून सांगितले, मीतुमच्या रुपावर भाळून तुमच्याशी लग्न करत नाहीतर मला समाजासाठी कार्य करायचे आहे. ज्या दिवशी तुम्ही मला विरोध कराल त्या दिवशी मीतुम्हांलासोडून जाईन.

त्या सलग तीन वेळा पट्टणकोडोली या गावच्या सरपंच म्हणून व एक वेळा हातकणंगले पंचायत समितीच्या सदस्य म्हणून निवडून आल्या. तत्पूर्वी त्या कोल्हापूर  महानगरपालिकेतसफाई कामगार म्हणून कार्यरतहोत्या. परंतु, त्यांचा सामाजिक कार्याचापिंड व आंबेडकरी चळवळीबद्दलची तळमळ त्यांना काही केल्या गप्प बसू देत नव्हती. ही नोकरी मध्येचसोडून त्या पट्टणकोडोली येथीलसमाजकारणात व राजकारणात सक्रिय झाल्या. आपल्या या नोकरीची परवा न करतात्यांनी आपल्या आजूबाजूच्या महिलांचे संघटन करुनत्यांचेहीसंपूर्ण आयुष्य बदलून टाकले.

**आम्रपाली महिलामंडळाची स्थापना :**

सर्वप्रथम त्यांनी इ. स. १९९३ मध्ये पट्टणकोडोलीत २४१ महिलांना एकत्र करुन नआम्रपाली महिला मंडळाची स्थापना केली.१ या महिला मंडळामध्ये विविध जाती-जमातींच्या महिलांचा समावेश  होता.

त्यांनी सामाजिक व राजकीय कारकिर्दीत अगदीच निःस्वार्थीपणे काम केले. जवळजवळ १५ ते २० वर्षे सत्ता उपभोगून ही त्या आजही स्वत: झोपडपट्टीत राहतात. एवढेच नाहीतर त्यांना या गोष्टीचा अभिमान वाटतो. पट्टणकोडोली येथे समाजकार्याचे व्रत घेतलेल्या या महिलेचे त्यांच्या विरोधकांनी पट्टणकोडोलीतील घरतीन वेळा पेटवून दिले. याची प्रचितीत्यांचे दप्तरहाताळताना आली. यातील बराचसा दस्त जळाला आहेतर काही अर्धवट जळालेल्या अवस्थेतील दिसून आला. परंतु, तरीही त्या डगमगल्या नाहीत व जनसेवेचा वसा त्यांनी सोडला नाही.

**पद्मिनीशिंगे यांची कार्यपध्दती :**

पद्मिनीशिंगे यांची कार्यपद्धती अनोखी होती. त्या गावातून फेरफटका मारत व महिलांचे क्षेम कुशल विचारत असत. त्यामुळे महिलांच्या अडीअडचणी त्यांच्या लक्षात येत असत. या वेळी त्या महिलांची जात वा धर्म लक्षात घेता त्या महिलेची गरज लक्षात घेऊन तिला त्या पद्धतीची मदत मिळवून देत असत. त्या शासना मार्फत राबवण्यात येत असलेल्या विविध योजनांचा पूर्ण  अभ्यास करत असत. त्यानुसार गरजू महिलांपर्यंत विविध योजनांचा लाभ मिळवून देत. त्यांनी सुरुवातीच्या काळात प्रौढ शिक्षणाचे वर्ग सुरु केले. यातून ब-याच महिलांना लिहिण्या-वाचण्याचे व सही करण्याचे शिक्षण दिलेगेले. या नव-शिक्षित महिलांची दुसरी, तिसरी, चौथी पास असे दाखले त्यांना काढून या महिलांना औद्योगिक क्षेत्रात नोक-या मिळवून दिल्या. या सर्व महिला त्यांच्या आम्रपाली महिला मंडळाच्या सदस्यहोत गेल्या. त्या एकत्र जमत तेव्हा पद्मिनीशिंगे त्यांना फुले, शाहू, आंबेडकरांचे विचार समजावून सांगत. त्या म्हणत,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेमध्ये सर्व जाती-जमातींच्या जनतेचीसोय करुन ठेवली आहे,तीतुम्ही लक्षात घ्या. जशा मागासवर्गीयांसाठी योजना आहेत, तशाच शेतकरी वा तत्सम लोकांसाठीही आहेत त्यांचा लाभ आपण घेतला पाहिजे. अज्ञानातून आपण जातवार विचार करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांकडे पाठ फिरवू नये. त्यांचे हे विचार मंडळातील महिलांना कळू लागले व त्या पद्मिनीशिंगे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहू लागल्या. पद्मिनीशिंगे म्हणतात, या माझ्या आया-बहिणी माझी ताकद आहेत. त्यांना सोबत घेऊन मी सरपंच व पंचायत समितीसदस्य झाल्यावर मोठी विकास कामे केली. आम्रपाली महिला मंडळातील या विविध जाती-धर्मातील महिलांनी मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या लढ्यात ही सहभाग घेतला आहे. प्रसंगी पोलिसांचा लाठीमार ही खाल्ला आहे. याबाबत त्या म्हणाल्या, श्रीमंत माणसे गरिबाला विचारत नाहीत. गरीब सवर्ण महिलांची आर्थिक परिस्थितीसमजून घ्यायला बाबासाहेबांच्या रक्ताचंच माणूस लागतं. या इतर जातींतील महिलांना राहायला घर नाही. कुटुंबात ४-५ मुलं ! त्या वेळंला १५ रुपये मजुरी  मिळायची. अशा या बायकांना मी उद्योग-धंद्यासाठी शासकीय योजनांची माहिती काढून त्यांना लाभ मिळवून दिले. या महिलांच्या अडीअडचणी जाणून घेऊन मी त्या सोडवण्याचा प्रयत्न करु लागले, तशा या महिला माझ्याकडं येऊ लागल्या. (त्यानंतर) मी त्यांना आंबेडकरांचे विचार समजूनसांगू लागले. त्यांना मी सांगत असे की, शाहू महाराजांनी जातीयतेची चौकट मोडली आहे. तेव्हा त्यांनादेखीलहे विचार पटू लागले. त्यांना मी म्हणाले, बघा तुमी विचार करा, माझ्यासोबत तुमी आल्यावर तुमालातुमच्या समाजाचा त्रास होईल.

**आम्रपाली महिला मंडळाचेनामांतराच्या लढ्यातील योगदान :**

औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नी निघालेल्या मोर्च्यांमध्ये व उग्र निदर्शनांमध्ये त्या सहभागी झाल्यामुळे त्यांच्यावर २७२ कायदेशीर प्रकरणे नोंद झालेली आहेत. त्या म्हणतात, हा लढा आम्ही सतत १६ वर्षे लढला. संपूर्णमहाराष्ट्र व देशभर जेथे-जेथे म्हणून आमची गरजहोतीतेथे-तेथे बाबासाहेबांच्या नावासाठी आम्ही गेलो. आमच्या महिला मंडळातील सर्व स्त्रियांनी मला साथ दिली. रात्री, अपरात्री जेव्हा-जेव्हा मी त्यांना हाक दिली त्या हातांतील कामे टाकून, घर-संसारातील जबाबदा-या सोडून माझ्यासोबत (त्या) लढायला

आल्या. या लढ्यातील आमच्या सोबतच्या एका मुलीचंत्यापायी लग्न मोडलं. तरी आम्ही डगमगलो नाही.

पद्मिनीशिंगे या कोल्हापूर, महाराष्ट्र व देशपातळीवरील लढ्यांसाठी विविध ठिकाणच्या मोर्चे, आंदोलनांसाठी जाऊन आल्या. कानपूर, भुसावळ, मनमाड, निपाणी, गारगोटी, हातकणंगले, इचलकरंजी, कोल्हापूर या व अशा विविध शहरांतून निघालेल्या मोर्च्यांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. वर्धा जिल्ह्यातील मोर्च्याच्या वेळी पोलिसांची काठी त्यांच्या मानेवर पडली. त्या वेळी या लाठीहल्ल्यात त्यांची जीभ तुटली तेव्हा त्यांच्या जिभेस टाके द्यावे लागले. नामांतराच्या लढ्यात त्यांना शिरोळच्या तुरुंगात ठेवले होते. त्या वेळी त्यांची मुलगीतीन महिन्यांचीहोती. या मुलीचा सांभाळ एका मराठासमाजातील महिलेने केला.

चळवळीतील या मंतरलेल्या दिवसांची आठवण सांगताना त्या सांगतात, त्या चळवळीत आम्हीदिल्लीला गेलो तेव्हा मी तरुण होते. तसेच, आमच्या सोबत असलेल्या इतर बायका व मुलेदेखील तरुण असताना आम्हाला ब-याच वेळा रेल्वे स्टेशनवर झोपावे लागे. त्या वेळी तरुण मुले व आम्ही बायका एका लुगड्याच्या पांघरुणाखाली झोपत असतानादेखील कधी वाईट अनुभव आला नाही. आम्हीजेवणासाठी घरातून भाकरी, चटणी घेत असू. जेवण संपले की, बोरं, करवंदं जे काही स्वस्त असेलते खात असू.

प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या दलित मुक्तीसेना या कोल्हापूर जिल्ह्यातील संघटनेच्या त्या कोल्हापूर जिल्ह्याच्या कार्यकारिणीत पट्टणकोडोलीच्या महिला आघाडी प्रमुख म्हणून कार्यरत होत्या.[३] या चळवळीच्या काळातील आठवणींना उजाळा देताना सांगतात की, त्या गावातून एकटे फिरत असताना आपल्या स्वसंरक्षणासाठी त्या नऊवारी साडीच्या ओटीत मिरची पूड लपवून ठेवत व सोबत विळा असे. यासंदर्भात त्या म्हणतात, मिरच्या विकत घ्यायला पैसेतरी कुठं असायचे. आम्ही बाजारातून पांढ-या पडलेल्या मिरच्या आणून त्यांची पूड तयार करायचो. अशा त-हेने जीवावर उदार होऊन व स्वतःच्या अब्रूची स्वतःच काळजी घेत त्या सामाजिक समस्यांविरुद्ध लढा देतहोत्या. या लढ्यात त्यांच्यासोबत दलित नेते शामप्रसाद कांबळे, दत्ता जाधव, बाबासाहेब वडगावकर, काळे, मिणचेकर, सुनील कांबळे, विजय कोल्हे होते. सांगली जिल्ह्यातील वाळव्याचे नागनाथअण्णा नायकवडी, कोल्हापूरचे बाबासाहेब वडगावकर अशा मोठ्या नेत्यांच्या सभांचे आयोजन ही त्यांनी यशस्वीपणे केल्याचे त्यांनी सांगितले.

**ग्रामपंचायत सदस्य व सरपंच म्हणून कार्य :**

इ.स. १९९२ मध्ये झालेल्या ग्राम पंचायत निवडणुकी वेळी त्यांनी समाजाच्या सर्व घटकातील व तळा-गाळातील लोकांचे प्रश्न हाती घेऊन व त्यांची सोडवणूक करत या कामांच्या पाठबळावर त्या निवडून आल्या. केवळ निवडून येण्यापुरते त्यांनी कामे केली नाहीत तर त्यांची ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवड झाल्यानंतर त्या ग्रामपंचायतीच्या कामाला सतत वेळ देत गेल्या. दिवसभर ग्रामपंचायतीच्या कामांची माहिती घ्यायची वया माहितीचा उपयोग विकास कामांसाठी करायचा. दि. ३१ जानेवारी १९९६ मध्ये त्यांच्याकडेसरपंचपद आले आणि गावाच्या विकासासाठी त्यांनी रस्त्याचे डांबरीकरण, पाण्याची पाईपलाईन, हरिजन वसाहतीसाठीच्या स्मशानभूमीमध्ये शेडचे बांधकाम, प्राथमिक शाळेच्या तीन खोल्यांचे बांधकाम, अलाटवाडी येथेसांस्कृतिक सभागृह, काळम्मावाडी नवीन वसाहत येथे मंदिराचे बांधकाम सुरु केले. अशी कामे करतअसतानाच सप्टेंबर १९९६ मध्ये त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव पारित करण्यात आला. परंतु, हा ठराव संमत झाल्यानंतर त्या सरपंचपदावर नसल्या तरी त्यांच्या कामाच्या पद्धतीत बदल केला नाही. या काळात त्यांनी साडेचारशे लोकांचे शिधापत्रिका विभक्त करण्याचे काम, ११९ लोकांचे निराधार योजनेतून पेन्शन मिळवून देण्याचे काम, संजय गांधी निराधार योजने अंतर्गत २१ जणांना मदत मिळवून देणे अशी कामे केली.

**स्त्रियांच्या प्रश्नाला महत्त्व :**

पती-पत्नीच्या कौटुंबिक वादांचे निरसन, विवाहित मुलींची नांदणे लावणे या कामी त्यांना चांगले यश आले. या माध्यमातून त्यांनी अनेक मुलींचे संसारसुखी केले. हळदी, कांडगाव, नेर्ली, कंदलगाव, कोगील, मजले, चंदूर, आदी गावांतून त्यांनी वरीलप्रमाणे कामे केली. अनेक बेघरांचे प्रश्न त्यांनी निकाली काढले. अनेकांना घरे बांधण्यासाठी भूखंड मिळवून दिले. त्यांनी सांगितले की, आतापर्यंत विविध जाती-जमातींच्या लोकांना एकूण ४२ एकर जमीन मिळवून दिली. पण त्यांमध्ये त्यांच्या वाट्याला काही घेतले नाही. याबाबत त्यांचे मत फार बोलके आहे. त्या म्हणतात, बाबासाहेबांनी जर असं बघितलं असतं तर त्यांच्या घरालासोन्याची कौले लागली असती. मीस्वतःपुरता स्वार्थ बघितला नाही. बाबासाहेबांचे विचार महत्त्वाचे मानले, पैसा नाही.

**दलितांच्या प्रश्नाला महत्त्व दिले :**

गावाच्या विकास कामांबरोबरच त्यांनी दलितांवरील अन्याय-अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम केले. यासाठी त्यांनी मोर्चे, उपोषणे, घेराव अशा मार्गांचा अवलंब केला. पट्टणकोडोली येथील कुमार विद्यामंदिर व कन्या विद्यामंदिर या प्राथमिक शाळांतील शिक्षक अण्णासाहेब आवटे, मारुती कागले व सौ. भारती फगरे या शिक्षकांच्या बदल्या झालेल्या होत्या. या दोन्ही शाळांतील मुख्याध्यापकांनी गावातील स्थानिक शिक्षकांकडून खोटी माहिती सांगून या शिक्षकांकडून बदलीचे अर्ज घेऊन त्यांच्या बदल्या केलेल्या होत्या. तेव्हा प्राथमिक शाळेतील या शिक्षकांच्या अन्याय झालेल्या बदल्या रद्द व्हाव्यात व मुख्याध्यापक, केंद्रप्रमुखांवर कडक कार्यवाही व्हावी या मागणीसाठी पद्मिनीशिंगे यांनी हातकणंगले पंचायत समितीसमोर बेमुदत उपोषण केलेहोते.

या उपोषणास आम्रपाली महिला मंडळाङच्या महिलासदस्यांनी या उपोषणास पाठिंबा देऊन उपोषणात सहभागी झाल्या होत्या.[४]

**घोटवडे येथील दंगल :**

पन्हाळातालुक्यातील घोटवडे या गावी मातंग समाजाच्या नऊ वर्षांच्या मुलीने पाण्याच्या विंधण विहिरीस बाटवले म्हणून व महार समाजातील एका व्यक्तीकडून ओप्यातून पलीकडे जाताना ओपा बाटला म्हणून भाताचे पिंजार खाऊ घातले. तसेच, अस्पृश्य समाजातील लोकांच्या घरांवर गावातील सवर्णांनी हल्ला केला. त्या वेळी ७०० सायकलींवरून पट्टणकोडोली येथील आम्रपाली मंडळातीलसदस्या, त्या गावचे तरुण व नेते मंडळी घोटवडे या गावी पोहोचले. तेथे पोहोचताच पद्मिनीशिंगे यांनी जोगतिणीचे सोंग घेऊन गावातून फेरफटका मारून गावाची संपूर्ण माहिती काढली. या निरीक्षणावेळी त्यांना असे लक्षात आले की, सवर्ण लोकांनी दोन ट्रक भरुन दगडगोटे, काठ्या, तलवारी, इ. जमा केले होते. याबाबत त्या सांगतात, गावातील सवर्ण वरच्या बाजूने व आम्ही खालच्या बाजूने होतो. या दंगलीतील मारामारीत आमच्या कार्यकर्त्यांचे हात-पाय व डोके फुटले. तेव्हा आम्ही खरातो काय निर्णय आम्हांला द्या, असे डी.एस.पी. माणगावकर यांना जाब विचारला. तेव्हा ते म्हणाले, तुम्ही काही काळजी करू नका, तुम्ही वापस जावा. आम्ही परत निघालो व थोड्या अंतरावर गेल्यावर गावात पुन्हा दंगल सुरु झाली. त्या वेळी रस्त्यातूनच आम्ही घोटवडे येथे परत फिरलो. तेव्हा मी डी.एस.पी.ला घाण शिव्या देऊन गाळपाट धरून चार-पाच चपल्या मारल्या व म्हणाले, बाबासाहेबांमुळे तुम्हांला फुल पैंट मिळाली, नाही तर खाली नागवं, वर भगवं झालं असतं. नंतर मिटवामिटवी झाली, पोलीस केस झाली. या केसचा निकाल आमच्या बाजूनं लागला.

निपाणीचा अस्पृश्य समाजाचा शिक्षकसकाळी उन्हाला बसला होता. त्याचं रेडकू एका सवर्णाच्या शेतात गेलं. तेव्हा त्या शेतकज्याने त्याच्यावर कुऱ्हाडीनेहल्ला केला. या हल्ल्यात त्या शिक्षकाचा फरातोडला गेला. त्याला न्याय मिळवून देण्यासाठी त्या निपाणी येथे गेल्या होत्या. वडणगे या ठिकाणीही अस्पृश्यांची घरे जाळलीहोती. तेथे देखील न्याय मिळवून देण्यासाठी त्या गेल्या होत्या.

वसगडे गावाचे सुशिक्षित बेरोजगार पोपट बाबू कांबळे यांचे रत्नाकर बँकेने प्रिंटिंग प्रेसचे कर्ज प्रकरण केलेहोते. सदर कर्ज प्रकरणतयार करण्यासाठी पोपट कांबळे यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही बँक कर्ज मंजूर करत नव्हती. तेव्हा घ्आम्रपाली महिला मंडळाङने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे धरले व त्यांस न्याय मिळवून दिला. तसेच, प्रेस टाकण्यासाठी गांधीनगर येथे २ गुंठ्यांचा भूखंड मिळवून दिला.[५]

पट्टणकोडोली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसवण्यासाठी पद्मिनीशिंगे यांनी पाठपुरावा करून हे काम पूर्ण करुन घेतले. यासाठी ग्रामपंचायतीने ठराव करून दलित वस्ती लगतचा ग्रामपंचायतीच्या मालकीच्या भूखंडावर तेथील तलाव बुजवून पुतळा बसवण्याचा ठराव केला. हा तलाव बुजवण्याचे काम या महिला मंडळाने केले. त्या वेळी या महिलांनी प्रतिदिनी २० रुपये असलेली मजुरी बुडवून हे काम केले व त्या ठिकाणी पुतळा बसवून घेतला.

पद्मिनीशिंगे यांच्या कामाचा प्रभाव त्यांच्या गावी पट्टणकोडोली येथे कोल्हापूर येथून त्यांच्यासमवेत गेलो असता जाणवला. पट्टणकोडोली येथे पूर्वसूचना देऊन गेलो. तेथे पोहोचताचतेथील समाजमंदिरात त्यांच्यासोबत चळवळीत काम करत असलेल्या महिलांनी मोठी गर्दी केलीहोती. आमचेतेथे आगमन होताच या महिला पद्मिनीशिंगे यांना कवटाळून रडू लागल्या. काही वेळानंतर या सर्व महिलांनी त्यांच्या चळवळीतील आठवणींना उजाळा दिला. पद्मिनीशिंगे यांच्यामुळे पट्टणकोडोली येथील समाजमन ढवळून निघालेहोते. त्यांच्या कार्यकर्तृत्वाने व त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार व प्रचार ज्या पद्धतीने केला, त्यामुळे अनेक जाती-जमातींतील महिला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे प्रभावित होऊन त्या आंबेडकरी चळवळीत काम करू लागल्या. त्यांपैकी काहीमहिलांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला, त्या पुढीलप्रमाणे-

**तंगव्वा सोमा कारंडे :**

तंगव्वा सोमा कारंडे या धनगरसमाजातील महिलेने नामांतरासाठीच्या इचलकरंजी, शिरोली येथील लढ्यात भाग घेतलाहोता. यासंदर्भात त्या उपोषणालादेखील बसल्या.[६]

**गंगूबाई अण्णाप्पा पाटील :**

जैन धर्मीय गंगूबाई अण्णाप्पा पाटील या महिलेने नामांतराच्या लढ्यात भाग घेतलाहोता. नामांतरासाठी मुंबई येथे निघालेल्या मोर्च्यात त्या सहभागी होत्या. मोर्च्याचे कडेतुटले व या महिला विखुरल्या गेल्या. त्यात गंगूबाई पाटील चुकल्या होत्या. याबाबत गंगूबाई पाटील यांचीमुलाखत घेतली असता त्या म्हणाल्या, शिंगे मॅडमसोबत काम करताना भीती गेली अन् धाडस आले. सर्व बाबांची (डॉ. बाबासाहेब आंबेडकर) कृपा! पद्मिनीशिंगे जेव्हा समाजाचे काम करत तेव्हा त्या मोर्चे, उपोषण, निदर्शने या विविध मार्गांचा अवलंब करत. त्यांना या कामी घरी येण्यास उशीर झाला की, त्यांच्या मुलांचा सांभाळ या गंगूबाईंनीच केल्याचेत्यांनी सांगितले. यासंदर्भात गंगूबाईंशी चर्चा केली असता त्या म्हणाल्या, आमचा समाज नावे ठेवील म्हणून दार झाकून त्यांच्यासाठी स्वयंपाक करून ठेवायची, त्यांच्या मुली माझ्याकडेच असत.[७]

**मुमताज कासिम कुडचे :**

मुमताज कासिम कुडचेही मुस्लीमसमाजातील महिलाही नामांतराच्या लढ्यात सहभागी झालीहोती. या विविध जाती-

धर्मातील महिला सार्वजनिक जयंती उत्सवातही मोठ्या प्रमाणात सामीलहोतात व आपल्या दारातून जयंतीची मिरवणूक चालली असता शुभशकुन म्हणून पाण्याच्या घागरी ओतून ओवाळणी करतात.[८]

**कस्तुरासुरेश कांबळे व बनूबाई कांबळे :**

कस्तुरासुरेश कांबळे या जन्माने मराठासमाजातील, परंतु बौद्ध समाजातील बनूबाई कांबळे यांचीसून असलेल्या कस्तुरासुरेश कांबळे यादेखील पद्मिनीशिंगे यांच्यासमवेत आंबेडकरी चळवळीत कामकरतात. त्यांच्या सासूबाई बनूबाई देखीलचळवळीत सक्रिय आहेत. त्या बाबासाहेबांची गाणी व पाळणा म्हणून आंबेडकरी विचारधारेचा प्रचार व प्रसार करतात.[९]

**अनुसया साताप्पा लुंबनाक :**

अनुसया साताप्पा लुंबनाक या देखील नामांतराच्या लढ्यात सहभागी होत्या. त्यांनी आठवण सांगितली, आमच्यावर मोर्च्यात टोमॅटो व अंडी फेकून मारली जात होती. तेव्हा आमच्यातील काही बायका मागे फिरु लागल्या. तेव्हा मीहातातल्या झेंडयाच्या काठीने मारामारी केली व सर्व महिलांना आता मागे फिरायचे नाही, पुढेच जायचे, असे आवाहन करून मोर्चा यशस्वी केला. त्यांना नामांतराच्या लढ्यात अटक झाली होती.[१०]

**विमल कौस्तुभ लुंबनाक :**

विमल कौस्तुभ लुंबनाक याही नामांतराच्या लढ्यात सहभागी होत्या. त्या म्हणाल्या, नामांतराच्या लढ्यात मार खाल्ला पण, फुले खाल्ली असे वाटते. [११]

**संगिता दीपक मधाळे :**

संगिता दीपक मधाळे या महिला आपली लहान दोन मुले घेऊन कोल्हापूर येथील बिंदू चौकात निघालेल्या मोर्च्यात सहभागी झाल्या होत्या. त्यांना कोल्हापूर बावडा येथील तुरुंगात ठेवले होते. या मोर्च्याच्या दरम्यान त्यांची मुले हरवली होती, ती नंतर पोलिसांनी शोधून दिली, असेत्यांनी सांगितले.[१२]

**आक्का तातोबा लुंबनाक :**

आक्का तातोबा लुंबनाक म्हणतात की, गावातील पुरुषमंडळी त्यांच्या महिला मंडळातील महिलांना कुत्सित बुद्धीने वेगवेगळ्या नावांनी संबोधित करत असत. ते आक्काताईंना जयश्री गडकर म्हणत. परंतु, त्यांनीत्याकडे लक्ष पुरवले नाही. आक्काताईंनी कोल्हापुरातीलबिंदू  चौकात मराठवाडा नामांतरासाठी निघालेल्या मोर्च्यात महाराष्ट्र शासनाच्या सांकेतिक प्रतिकाचे दहन केले व मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारावेळी करतातततसे लोटके(मडके) फोडून बोंब मारली.  (मराठवाडा)विद्यापीठाला आमच्या बाबांचं नाव आम्हांला पाहिजे, अशी आम्हांस्त्रियांची धारणाहोती, असे त्या मुलाखती दरम्यान म्हणाल्या. आक्काताईंनी तेव्हाच्या व आताच्या चळवळीची तुलना करताना म्हणाल्या, आताच्या बायका कसली चळवळ करत्याती, समदं काही घरासाठी करत्याती. आम्ही मातूर बाबांच्या नावासाठी लढलो, घराची परवा केली नाही.[१३]

**निष्कर्ष :**

पद्मिनीशिंगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचे मर्म जाणले असूनतेत्यांनी आपल्या प्रत्यक्ष कृतीत उतरविले दिसते. आंबेडकरी चळवळीत काम करायचेतर मातंग जातीतील तरुणासोबत लग्न केल्यास तो या चळवळीत काम करु देईल किंवा नाही या भीती पोटी त्या सैन्यातील एका महार जातीतील तरुणासोबत विवाह करतात. यात त्यांचा उद्दिष्टाप्रति दृढनिश्चय दिसून येतो. त्याच्या पूर्ततेसाठीत्यांनी स्वत:च्या विवाहा संदर्भातील निर्णय देखील स्वत:च घेतल्याचे दिसते.

त्यांनी त्यांच्या सार्वजनिक जीवनामध्ये काम करताना स्वार्थ साधला नाही. बाबासाहेबांनी विचार केला असता तर त्यांच्या घरालासोन्याची कौले लागली असती, असे त्या या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतात.

पद्मिनीशिंगे यांच्या व्यक्तिमत्वावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव पडल्यामुळे त्या पारंपारिक विचार सोडून नव्या विवेकावर आधारित विचारांचा अंगिकार करताना दिसतात. त्या त्यांच्या वैयक्तिक जीवनामध्ये कधीही निरुपयोगी कर्मकांड करीत नाहीत. तसेच, त्यांनी विधायक कामांसाठी स्थापन केलेल्या आम्रपाली महिला मंडळातील महिलासदस्यांना देखील या विचारांचे बाळकडू देतात.

त्या सांप्रदायवादी भूमिकेतून आपल्या जाती पुरता विचार न करता अधिक व्यापक भूमिकेतून गावातील व त्यांच्या वस्तीतील सर्व जाती धर्माच्या स्त्रियांच्या कल्याणाचा विचार करतात. तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची विशालता व सर्वसमावेशकता त्या त्यांच्या गावातील  स्त्रियांना पटवून देतात. त्यामुळे या स्त्रिया मराठवाडा विद्यापीठ नामांतरासारख्या प्रश्नीदेखील त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून या व इतर आंदोलनांमध्ये सहभागी होताना दिसतात.

स्त्रिया या जाती व्यवस्थेचे प्रवेशद्वार आहे, असे म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर विचार केला असता स्त्रियांच्या आंबेडकरी चळवळीच्या इतिहासात विविध जाती-धर्मातीलस्त्रियांचेसंघटन करून त्यांना बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अंगीकृत करावयास लावणे व या अशिक्षित व अर्धशिक्षित स्त्रियांनी जाती-पातीचा विचार न करता अन्याया विरुद्ध प्रतिकारास सिद्धहोणे, ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील नव-भारताच्या निर्मितीची नांदी ठरावी. विशेषतः जाती व्यवस्थेच्या गुणधर्माच्या विपरीत तथाकथित उच्च जातीतीलस्त्रियांनी खालच्या स्तरातील मानल्या गेलेल्या मातंग-बौद्ध समाजातील स्त्रियांच्या बरोबरीने येऊन जातीची पारंपारिक चौकट मोडून भगिनी-भाव निर्माण करून एकत्रित येतात व अन्याया विरुद्ध उभ्या राहताना दिसतात, ही गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक अंतराभिसरण

(Social Endosmosis) १३ या संकल्पनेचे प्रतिरुप मानता येईल.

हीच या आम्रपाली महिला मंडळाची यशोगाथा म्हणता येईल.

**संदर्भ :**


१. धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांचे नोंदणी प्रमाणपत्र.

२. शिंगे, पद्मिनी यांची मुलाखत, दि. १५.१०.२०१०.

३. दलित मुक्तीसेनेची कार्यकारिणी जाहीर केल्याचे पत्र.

४. भंडारे, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांना दिलेले निवेदन दि. ६ नोव्हेंबर १९९८.

५. आम्रपाली महिला मंडळ, पट्टणकोडोली यांचे कोल्हापूर जिल्हाधिकारी यांना दिलेले निवेदन, दि. ११ नोव्हेंबर १९९३, या मंडळानेहुपरी पोलीसस्टेशनला घेराव घालण्यासाठी दिलेला अर्ज व दै. केसरी : २६ नोव्हेंबर १९९३ मधील वृत्त.

६. कारंडे, तंगव्वा सोमा यांची मुलाखत, दि. १५.०४.२०१२.

७. पाटील, गंगूबाई अण्णाप्पा यांची मुलाखत, दि. १५.०४.२०१२.

८. कुडचे, मुमताज यांची मुलाखत, दि. १५.०४.२०१२.

९. कांबळे, कस्तुरासुरेश व बनूबाई कांबळे यांची मुलाखत, दि. १५.०४.२०१२.

१०. अनुसया यांची मुलाखत, दि. १५.०४.२०१२.

११. लुंबनाक, विमल यांची मुलाखत, दि. १५.०४.२०१२.

१२. मधाळे, संगिता यांची मुलाखत, दि. १५.०४.२०१२.

१३. लुंबनाक, आक्का यांची मुलाखत, दि. १५.०४.२०१२.

१४. Dr. Babasaheb Ambedkar: Writing and Speeches, Vol. I, Annihilation of Caste, Third Edition, Editor: Prof. AvinashDolas, Govt. of Maharashtra, २०१६, P.५७.


❖❖❖

**31**

# स्वातंत्र्योत्तर कालखंडातील प्राथमिक शिक्षण एक आढावा


**श्री. दिलीप बाबुराव काळे**
संशोधक,
डॉ.बा.आं.म. विद्यापीठ,औरंगाबाद.

**डॉ. आनंद माधवराव वाघ**
आजीवन शिक्षण व विस्तार, विभाग
डॉ.बा.आं.म. विद्यापीठ,औरंगाबाद.


**********

प्राथमिक शिक्षणाची सुरुवात फार पुर्वीच्या काळापासुन झालेली आहे. गुरुच्या घरी किंवा आश्रमात जावुन शिक्षण घेण्यापासुन ते विविध शिक्षणसंस्थानी चालवलेल्या सार्वजनिक शाळापर्यंतचा हा प्रवास खुप मोठा आहे. सुरुवातीपासुन प्राथमिक शिक्षणामध्ये ज्या उणिवा राहील्या त्या स्वातंत्र्य मिळेपर्यंत भरुन निघाल्या नाहीत. प्रत्येक वेळेस काहींना काही तात्पुरत्या सोयी सुविधा उपलब्ध करुन प्राथमिक शिक्षण दिले गेले परंतु दिर्घकालीन शिक्षण विषयक योजना राबवली गेली नाही. म्हणुन स्वातंत्र्यप्राप्ती पर्यत प्राथमिक शिक्षणाचे स्वरुप मर्यादित राहीले.

प्राथमिक शिक्षण हे पायाभुत शिक्षण आहे. विद्यार्थ्यांचा बौध्दीक,भावनिक,शारिरीक विकास हा प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातुनच होत असतो. परंतु हा विकास करण्यासाठी प्राथमिक शिक्षणामध्ये सुधारणा करणे आवश्यक होते.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत पारतंत्र्यातुन मुक्त झाला आणि १४ नोव्हेंबर १९४९ ला भारतीय राज्यघटनेला मान्यता मिळाली व २६ जानेवारी १९५० पासुन राज्यघटनेची आंमलबजावणी सुरु झाली. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशासमोर असंख्य अशा समस्या होत्या. त्यामध्ये गरिबी,बेकारी,निरक्षरता आर्थिक स्थिती या सर्व गोष्टींचा विचार करुन तत्कालीन शिक्षणतज्ञांनी ,विचारवंतांनी अशा समस्या सोडवण्यासाठी एकमेव साधन म्हणजे शिक्षण आहे हे जाणले. व तेव्हापासुन शासनाने